ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

स्वांतत्र्यपूर्व काळातील सोलापूरातील गिरणी कामगार महिलांची सामाजिक—आर्थिक स्थिती : एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप

प्रा.अंबादास धर्मा केत
इतिहास व प्रा.भा.इ.सं व पुरातत्वशास्त्र विभाग,चां.ता.बोरा महाविद्यालय,शिरुर,जि.पुणे.

प्रस्तावना :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात तत्कालीन मुंबई प्रांतात खऱ्या अर्थाने आधुनिक म्हणता येईल अशा औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली. मुंबई शहरात १८५३ साली कापडाची पहिली गिरणी सुरु झाल्यांनतंर मुंबईसह प्रांतातील अहमदाबाद, सोलापूर इ.शहरात एकापाठोपाठ एक अनेक कापड गिरण्या सुरु झाल्या. कापड गिरण्या व कापड उद्योगाशी संबंधित इतर कुटीर उद्योगामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन—तीन शतकात म्हणजे साधारणपणे जागतिक मंदीच्या काळापर्यंत मुंबई प्रांतातील मुंबईसह अहमदाबाद व सोलापूर हीच प्रमुख औद्योगिक केंद्रे होती.[१]

सोलापूरातील कापड गिरण्या :

मध्ययुगीन काळापासून भरभराटीस आलेल्या हातमागासारख्या कुटीरोद्योगामुळे सोलापूर शहराला कापड उद्योगाची परंपरा होती. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे सोलापूरच्या नव्या औद्योगिक पर्वाला प्रारंभ होऊन औद्योगिक क्षेत्रातील कामगारांची संख्या काळानुसार वाढत गेली. मुंबईस्थित भाटिया उद्योगपती शेठ मुरारजी गोकुळदास यांनी १० डिसेंबर १८७४ रोजी स्थापन केलेल्या ''सोलापूर स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल'' नामक कंपनीने १६ फेब्रुवारी १८७५ रोजी सोलापूरातील पहिल्या कापड गिरणीचा पाया घातला. मार्च १८७७ मध्ये प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात करणाऱ्या आणि जुनी गिरणी म्हणून प्रसिध्दीस आलेल्या या कापड गिरणीतून सूताच्या उत्पादनासह लांब पल्ल्याचे कापड, प्रासंगिक वापरावयाचे कापडाचे तागे, डंगरी, टॉवेल आणि शिडाचे कापड तयार होत असे. अल्पावधीत गिरणीला झालेल्या अमाप नफ्यामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कंपनीने गिरणीचा विस्तार करुन ६ मे १९०६ रोजी बी मिल नावाची दुसरी गिरणी सुरु केली. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळातही कापड उद्योगातील तेजीमुळे १२ ऑगस्ट १९२१ रोजी सोलापूरातील या कंपनीने सी मिल ही तिसरी गिरणी सुरु केली. या विस्तारामुळे गिरणीतील कामगारांचीही संख्या वाढत गेली. जुन्या गिरणीच्या यशानंतर सोलापूर शहरात आणखी कापड गिरण्यांची भर पडली. इ.स. १८९६ साली नोंदणी झालेल्या नरसिंगजी मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने नोव्हेंबर १८९७ साली ''दि राजा बहादूर नरसिंगजी मिल'' या गिरणीची स्थापना करुन १३ फेब्रुवारी १८९८ रोजी प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात केली. नरसिंगजी गिरणीच्या बरोबरीने मुंबईचे उद्योगपती शेठ लक्ष्मीदास खेमजी यांच्या ''लक्ष्मी कॉटन मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने'' ३१ डिसेंबर १८९६ रोजी श्री लक्ष्मी मिलचा पाया घातला. १९ डिसेंबर १८९८ रोजी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेल्या या गिरणीतूनही उत्तम दर्जाच्या कापडाची निर्मिती होऊ लागली. लक्ष्मी गिरणीचे व्यवस्थापन पाहणाऱ्या मेमर्स बॉम्बे कंपनी लि. या व्यवस्थापनाने सोलापूरात १ जुलै १९१० रोजी विष्णू कॉटन मिल या नावाची दुसरी गिरणी सुरु केली. सुमारे ३० लाख रुपयांचे प्रारंभिक भांडवल गुंतवून सुरु झालेल्या या गिरणीत सूत व

कापडाचे उत्पादन होऊ लागले. याच काळात प्रभावी असलेल्या स्वदेशी चळवळीने भारावलेल्या नरोबा दत्तात्रय बुबणे व शेठ नरसिंगदास मंत्री या स्थानिक व्यापाऱ्यांनी मुंबईचे उद्योगपती शेठ लालजी नारायण यांच्या साहय्याने ११ डिसेंबर १९०७ रोजी जामश्री या नव्या गिरणीचा पाया घातला.[२] २८ डिसेंबर १९०९ रोजी गिरणीतील उत्पादनाला सुरुवात झाली.

कापड गिरण्यातील महिला कामगार :

सोलापूरसह मुंबई प्रांतातील सर्वच कापड उत्पादन केंद्रातील सूत व कापड निर्मितीच्या गिरण्यांमध्ये पुरुष कामगारांचे वर्चस्व असले तरी महिला कामगारांची संख्याही लक्षणीय होती. स्वातंत्र्यपूर्व काळात संपूर्ण देशाचा विचार करता एकटया मुंबई प्रांतात देशातील औद्योगिक क्षेत्रातील एकूण महिला कामगारांपैकी ३३.६० टक्के महिला काम करीत असून त्यातही कापड गिरण्या व कापड उद्योगाशी संबंधित उद्योगात कार्यरत महिलांची संख्या सर्वाधिक होती.[३] विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात सोलापूर शहरात स्थापन झालेल्या व सुस्थितीत चालणाऱ्या जुनी गिरणी, लक्ष्मी, विष्णू, नरसिंगजी व जामश्री या पाच प्रमुख गिरण्यातील कामगारांची संख्या वाढत जाऊन सोलापूर हे प्रांतातील तिसऱ्या क्रमाकांचे औद्योगिक केंद्र बनले. गिरण्यांच्या स्थापनेमुळे साहजिकच स्थानिक व आसपास असलेल्या जवळच्या गावांतील महिलांना गिरण्यांत रोजगाराची संधी उपलब्ध झाली.महिला कामगारांच्या संख्येचा विचार करता १९२१ च्या जणगणनेनुसार शहरातील पाच गिरण्यांमध्ये सुमारे ४३३५[४] तर १९३१ च्या जणगणनेनुसार ५०६४ महिला कामगार कार्यरत होत्या.[५] पुरुष कामगारांच्या संख्येबरोबर सोलापूरातील महिला कामगारांची संख्याही वाढत गेली.• शहरांतील कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या पुरुष कामगारांच्या बायकांचेच महिला गिरणी कामगारांमध्ये प्रमाण अधिक असून आपल्या नवऱ्याचा पगार कुटुंबाच्या उपजीविकेसाठी अपुरा पडत असल्याने या महिलांना गिरण्यांत काम करावे लागे. मात्र, गिरण्यांमध्ये चांगला पगार मिळविणारे विणकर किंवा विणकाम विभागातील कामगार आपल्या बायकांना सहसा गिरण्यांत कामाला पाठवित नसत.

•सोलापूरातील गिरणी कामगार महिलांची पंचवीस वर्षांत वाढत गेलेली संख्या दर्शविणारी सारणी

सन	एकूण कामगार	महिला कामगार	पुरुष कामगारांच्या तुलनेत एकूण प्रमाण
१८९७	१४७६	४८५	३२.८५
१८९८	१७९९	५८४	३२.४६
१८९९	३४६९	१४३५	४१.३६
१९००	४६२९	१४६६	३१.६६
१९०१	४४५२	१६८३	३७.८०
१९०२	५१३०	१९१४	३७.३०
१९०३	.....	.....	.....
१९०४	५५९८	२०७२	३७.०१
१९०५	.....		.....
१९०६	६२००	२२००	३५.४८
१९०७	६४६७	२२४७	३४.७४
१९०८	७२३३	२१९१	३०.२९
१९०९	७८९२	२३८२	३०.१८
१९१०	९७८१	२७३३	२७.९४
१९११	९०३१	२४८९	२७.५६
१९१२	१००५७	३०२६	३०.८८
१९१३	११६०२	३४८८	३०.६३
१९१४	११५२८	३१५७	२७.३८

१९१५	११०९७	२८३१	२५.५१
१९१६	१२६९१	३१५७	२४.८७
१९१७	१०८९६	२५१५	२३.०८
१९१८	११३०२	२७९४	२४.७२
१९१९	१३४०५	३६२०	२७.००
१९२०	१२८१९	३४३८	२६.८१
१९२१	१६१००	४३३५	२६.९२

(सदर कामगारांची संख्या ही केवळ प्रौढ कामगारांची असून ही संख्या ॲन्युअल फक्टरी रिपोर्ट ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या १८९७ ते १९२१ च्या वार्षिक अहवालांतून संकलित करण्यात आली आहे.)

गिरण्यांतील कामाचे स्वरुप :

सोलापूरातील महिला कामगारांच्या कामाच्या स्वरुपाचा व स्थितीचा विचार करता प्रामुख्याने गिरण्यांतील रिलींग,(सूताची गुंडाळी) वायंडिंग,(सूताची अपेक्षित लांबी मिळविण्यासाठी गुंडाळी करण्याची प्रक्रिया) रिंग स्पिनिंग,(सूत कताई) मिसिंग ॲन्ड वेस्ट डिपार्टमेंट, फोल्डींग,(घडया घालणे) ब्लिचिंग व डाईंग विभाग इ. विभागामध्ये काम करीत असत. विशेषत: रिलींग व वायडिंग विभागात महिला कामगारांचे वर्चस्व असून रिलींग विभागात जवळपास १०० टक्के तर वायडिंग विभागातील एकूण कामगारांपैकी महिला कामगारांचे प्रमाण ७३ टक्के होते. गिरण्यांतील वरील प्रमुख विभागांशिवाय हेलकरी म्हणजे हमाली काम करणे, कोळसा वाहणे, झाडू मारणे किंवा गिरण्याच्या आतील व बाहेरील साफसफाई करणे इ. कामांत महिला कामगार कार्यरत होत्या.[६] काही महिला कामगार जॉबर किंवा सुपरवायझर या पदावर काम करीत असत, मात्र त्यांचे प्रमाण फारच अल्प होते. उदा— १९३७—३८ च्या टेक्सटाईल लेबर रिपोर्टनुसार केवळ ३२ महिला कामगार सुपरवायझर म्हणून काम करीत असल्याची माहिती मिळते. १९२१ च्या महिला कामगारांच्या विविध विभागातील कामाच्या स्वरुपाच्या वर्गीकरणानुसार सोलापूरातील पाचही गिरण्यांत मिळून ३७७२ महिला कामगार कार्यरत असून त्यापैकी सर्वाधिक म्हणजे २०३८ महिला रिलींग विभागात, ११५० वायंडिग विभागात, मिसिंग ॲन्ड वेस्ट विभागात २२१, ब्लिचिंग आणि डाईंग विभागात ५४, रिंग स्पिनिंग विभागात १०, कार्ड रुममध्ये ४, २३६ झाडू मारणे किंवा साफसफाई करणे, तर ३० महिला कामगार कोळसा वाहण्याचे काम करीत असल्याची माहिती मिळते.[७] जुलै १९३७ च्या आकडेवारीनुसार सोलापूर गिरण्यांत रिलींग विभागात १२९०, वायडिंग विभागात २०४५, फोल्डिंग विभागात १४, हेलकरी किंवा हमाली करणाऱ्या १६४ आणि साफसफाई करणाऱ्या २५२ महिला कामगार होत्या. या गिरणी कामगार महिलांना फॅक्टरी कायद्यानुसार दर आठवडयाला ६० व रोजी १० तास काम करावे लागे. येथील बहुतांशी म्हणजे जवळपास ९५ टक्के महिला या पिस रेट म्हणजे नग दरावर तर उर्वरीत ५ टक्के महिला कामगार या टाईम बेस किंवा वेळ तत्वावर काम करीत असत. या कामगारांना दुपारच्या जेवणासाठी एक तासाची विश्रांती, दर आठवडयाला एक दिवसाची तसेच सणवारालाही सुट्टी असे. मात्र, पूर्वपरवानगी शिवाय एक दिवस गैरहजर राहिल्यास दोन दिवसांचे वेतन कपातीची 'डबल खाडा पध्द्त' सोलापूरात प्रचलित होती.[८] महिला कामगारांनी सुटीच्या दिवशी अतिरिक्त वेळ काम केल्यास त्यांना सव्वापट वेतन मिळत असल्याची माहिती मिळते.[९] गिरण्यांत काम करणाऱ्या महिला कामगारांमध्ये कायम किंवा पूर्ण वेळ काम करणाऱ्या महिला व अस्थायी स्वरुपाचे किंवा बदली कामगार म्हणून काम करणाऱ्या महिला कामगार अशा दोन प्रकारचे कामगार होते.

धर्म व जातीनिहाय स्थिती—

सोलापूरातील कापड गिरण्यांत समाजातील सर्व जाती—धर्मातील महिला कामगार काम करीत होत्या. १९२८ च्या एका सर्वेक्षणानुसार सोलापूरातील गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांमध्ये हिंदूमधील उच्च जातीतील ३७, मागासवर्गातील ३२, आणि भटक्या जाती—जमातील ११ टक्के म्हणजे जवळपास

८० टक्के महिला कामगार हिंदू धर्मातील होत्या. मुस्लिम महिलांचे प्रमाण ११ टक्के, तर ५ टक्के ख्रिश्चन व इतर किंवा ज्यांच्या जाती—धर्मासंबंधी माहिती उपलब्ध झाली नाही अशा ४ टक्के महिला कामगार होत्या.[१०] जातीच्या अनुषंगाने विचार करता हिंदूमधील तथाकथित उच्च जातीतील ब्राहमण, मराठा, लिंगायत,मागासवर्गीय समाजातील महार, मातंग, भटक्या जातीतील कैकाडी, मांगगारुडी, कंजारभाट, वडार, वंजारी इ. महिलांचा गिरणी कामगारांमध्ये समावेश होता. मुस्लिम धर्मातीलही छोटया—छोटया उपजातीतील महिला गिरण्यांत काम करीत होत्या. १९ व्या शतकाच्या सुरुवातीलाच सोलापूरात सुरु झालेल्या अमेरिकन मराठी मिशनच्या कार्यामुळे येथे धर्मांतरीत भारतीय ख्रिश्चनांची संख्याही बऱ्यापैकी असल्यामुळे ख्रिश्चन महिला कामगारही गिरण्यांमध्ये दिसून येतात. या महिला कामगारांचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी सोलापूरातील तीन गिरण्यांमध्ये ख्रिश्चन महिला काम करीत असल्याची माहिती मिळते. सुरुवातीच्या काळात मिशनच्या कार्याला स्थानिकांचा असलेला विरोध मिशनच्या सेवाभावी व शैक्षणिक कार्यामुळे पूर्णपणे मावळला होता.[११] परिणामी कापड गिरण्यांतील ख्रिश्चन महिला कामगारांच्या बाबतीत गिरणी व्यवस्थापन किंवा सहकारी कामगार महिलांकडून कोणताही भेदभाव किंवा गैरवर्तन झाल्याची माहिती मिळत नाही. काही ख्रिश्चन महिला मुकदम किंवा सुपरवायझर म्हणून काम करीत असून सोलापूरातील जीवनमानाच्या प्रमाणात त्यांना गिरण्यांमध्ये चांगला पगार मिळत असे. मात्र इतर विभागात काम करणाऱ्या महिलांची तसेच घटस्फोटित ख्रिश्चन महिलांची परिस्थिती फारशी चांगली नव्हती. सोलापूरातील बहुतांशी गिरणी कामगार महिला आपल्या पतीसह गिरणीत काम करीत असल्या तरी विधवा, घटस्फोटित, निराधार व कुमारिका अशा गटातील बऱ्याच महिला गिरण्यांमध्ये काम करीत असत. कामगारांच्या सामाजिक वर्गीकरणाच्या संदर्भात ठळक लक्षात येणारी बाब म्हणजे सोलापूरात हातमागाचा व्यवसाय भरभराटीत चालत असल्याने शहरात लक्षणीय लोकसंख्या असलेल्या विणकर जमातीतील महिलांची गिरणी कामगार म्हणून संख्या अत्यंत नगण्य होती. मात्र, हातमाग उद्योगातील मंदीच्या काळात आर्थिक गरजा भागविण्यासाठी विणकर समाजातील महिला बदली किंवा तात्पुरत्या कामगार म्हणून गिरण्यात काम करीत असत.

महिला कामगारांची कौटुंबिक स्थिती:

तत्कालीन बालविवाहाच्या पध्दतीमुळे सोलापूरातील बहुतांशी गिरणी कामगार महिला विवाहित असत. या कामगार महिलांना गिरणीतील काम व लहान मुलांचा सांभाळ करण्याबरोबरच घरातील सर्व कामे अशी दुहेरी जबाबदारी पार पाडावी लागे. सोलापूरातील जवळपास ९० टक्कयांपेक्षा अधिक महिला कामगारांना आपल्या घरातील सर्व कामे करुन गिरण्यांत १० तास काम करावे लागे.[१२] गिरणीतील दिवसभराचे काम व घरकामाच्या ताणाबरोबरच आपल्या लहान मुलांना सांभाळण्याची जबाबदारी ही महिला गिरणी कामगारांची एक महत्वाची समस्या होती. या समस्येवर किंवा अडचणीवर उपाय म्हणून सोलापूरातील गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या महिला कामावर जाताना आपल्या लहान मुलांना बराच काळ झोप लागावी म्हणून अफू खाऊ घालत असत.[१३] संपूर्ण मुंबई प्रांतात सर्रास रुढ असलेल्या या पध्दतीमुळे कामगारांच्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची माहिती मिळते.[१४] काही वेळेला कामगार महिला आपल्या मुलांना सांभाळण्यासाठी शेजाऱ्यांना दरमहा थोडीशी रक्कम देऊन त्यांच्याकडे आपली मुले सोपवित असत. तर काही वेळेला घरातील शाळेत जावयाच्या मुलांकडे छोटया मुलांना सांभाळण्याची जबाबदारी असे. यामुळे शाळा शिकण्याचे वय असलेल्या मुलांच्या शिक्षणावर मात्र परिणाम होत असे.

कामगार महिलांचे आरोग्य :

गिरण्यांतील काम, कौटुंबिक जबाबदारी यामुळे महिला कामगारांच्या आरोग्यावर व शारीरिक क्षमतेवर गंभीर परिणाम होत असत. गिरण्यांमध्ये काम करुन या महिला कामगार आपल्या कुटुंबाच्या खर्चाला हातभार लावत असल्या तरी घरातील काबाडकष्ट व ताण—तणावापासून त्यांची सुटका नव्हती. दिवसभरातील केवळ कामावर येण्या—जाण्याचा पंधरा—वीस मिनिटांचा वेळ सोडला तर या महिला कामगारांना मोकळा श्वास घ्यायला फारशी फुरसत मिळत नसे. घरकाम व गिरणीतील कामाच्या भारामुळे व दिवसभरातील अती श्रमामुळे महिला कामगारांची शारीरिक वाढ व विकास खुंटत असल्याची माहिती

मिळते. त्यातही महिलांच्या ठायी असलेल्या सार्वत्रिक समर्पित वृत्तीमुळे गिरण्यांतील महिला कामगारांना पुरेशी विश्रांती व आराम मिळणे दुरापास्त होत असे. इतकेच नाही तर कित्येक गरोदर महिला कामगारांना प्रसुतीच्या वेळेपर्यंत गिरण्यांमध्ये काम करावे लागल्याची उदाहरणे आहेत.[१५] प्रसुतीनंतरच्या काळातही घरातील इतर सदस्यांना कामावर जावे लागत असल्याने महिला कामगारांला स्वत:लाच स्वत:ची व नवजात बाळाची काळजी घ्यावी लागे. बाळंतपणाच्या काळात महिला कामगारांना कित्येकदा ताज्या व सकस आहराचा अभाव असे. प्रसुतीनंतरच्या पाचव्या किंवा सहाव्या दिवसापासून आपल्या बाळाची सुश्रुषा तिला स्वत:लाच करावी लागे. काही महिला प्रसुतीनंतरच्या दहा दिवसांतच गिरण्यांमधील कामावर परत येत असत, याउलट काही महिलांना कामावर जाण्याची तात्काळ आवश्यकता नसली तरी त्यांना अकराव्या दिवसांपासून घरातील सर्व कामे मात्र करावी लागत असत. प्रसुतीच्या एक किंवा दोन महिन्यानंतर घरातील आर्थिक निकडीनुसार या महिलांना पुन्हा एकदा गिरणीतील काम सुरु करावे लागे. त्यामुळे या महिला कामगारांमध्ये निस्तेजपणा, रक्तक्षय इ. शारीरिक दोष सर्रास आढळून येत असत.

वेतन व इतर आर्थिक सवलती:

मुंबई प्रांतातील मुंबई व अहमदाबाद शहरातील गिरणी कामगारांच्या तुलनेत सोलापूर शहरातील गिरणी कामगारांचे वेतन कमी होते.[१६] वास्तविक पाहता मुंबई प्रांतातील इतर गिरण्यांच्या तुलनेत सोलापूरातील गिरण्या उत्तम स्थितीत चालत होत्या. विशेष म्हणजे सोलापूरातील प्रंचड प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या जुन्या गिरणीसारख्या जागतिक किर्तीच्या गिरणीला मोठया प्रमाणावर नफा मिळत असतानाही येथील स्त्री–पुरुष कामगारांचे वेतन सर्वच पातळयांवर कमी असल्याचे आढळून येते.[१७] १९२१ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार सोलापूरातील दररोज दहा तास काम करणाऱ्या गिरणी कामगार महिलांचे सरासरी रोजी वेतन ६ आणे ९ पैसे इतके होते. त्यातही सुमारे ९१.६० टक्के महिलांची मिळकत सरासरी आठ आण्यांपेक्षा कमी होती, आठ ते बारा आण्यांपर्यत वेतन असणाऱ्या महिलांचे प्रमाण ७.७ तर बारा ते सोळा आणे वेतन मिळविणाऱ्या महिलांचे प्रमाण दरहजारी ७ इतकेच होते. याच काळात अहमदाबादमधील महिला कामगारांना रोजी सरासरी १२ आणे १ पैसा तर मुंबईतील महिला कामगारांना सरासरी १० आणे ९ पैसे इतके वेतन मिळत असल्याची माहिती मिळते.[१८] जुलै १९२६ ते डिसेंबर १९३७ या कालावधीत सोलापूरातील कापड गिरणी कामगारांच्या मूळ वेतनात कसल्याही प्रकारचा बदल झाला नाही. १९३४ साली गिरण्यांच्या उत्पादनांवर परिणाम झाल्याने साडेबारा टक्के वेतन कपात झाली. मात्र या वेतन कपातीचा निर्णय मासिक तेरा रुपयांपेक्षा कमी वेतन असलेल्या कामगारांसाठी लागू असल्याने मूळातच कमी वेतन असलेल्या महिला कामगारांवर या कपातीचा फारसा परिणाम झाला नाही. पहिल्या महायुध्दानंतरच्या काळात धान्याच्या किंमती वाढल्यामुळे सोलापूरातील गिरण्यांनी कामगारांना नियमित पगाराशिवाय धान्य भत्ता देण्याची पध्दत सुरु केली.[१९] सोलापूरच्या औद्योगिक व कामगार विश्वाचे वैशिष्टय ठरलेल्या या पध्दतीमुळे दुष्काळी स्थिती व वारंवार धान्याच्या किमंतीत होणारी वाढ या संकटापासून कामगारांना निश्चितपणे दिलासा मिळाला. मात्र, हे धान्य मिळविण्यास पात्र ठरण्यासाठी कामगारांनी महिन्यातील चार दिवसांपेक्षा अधिक दिवस कामाचे खाडे करु नये ही पूर्व अट होती. म्हणजेच चार दिवसांपेक्षा कमी खाडे असलेल्या कामगारांना दरमहा प्रत्येकी अठरा शेर ज्वारी व दोन शेर तूरदाळ असे वीस शेर धान्य मिळत असे. या धान्याच्या मोबदल्यात बाजारातील किमंतीचा विचार न करता प्रत्येक कामगाराच्या वेतनातील मासिक दोन रुपयांची कपात केली जाई. महिला कामगारांच्या बाबतीत विचार करता आधीच तुटपुंजे वेतन असल्यामुळे कामगार महिला या धान्य भत्याच्या नियमितपणे लाभ घेत असल्याची माहिती मिळते. दुसऱ्या बाजूला १९२८ च्या जुन्या गिरणीच्या कामगार हजेरी पत्रकानुसार साधारणपणे ५५ टक्कयांपर्यतच्या महिला कामगारांचीच नियमित हजेरी असल्याने या धान्य भत्त्याचा महिला कामगारांना किती फायदा होत होता हा विवादाचा प्रश्न आहे.[२०] मात्र धान्य भत्यासाठी बहुतांशी महिला कामगारांमध्ये कामाचे खाडे करण्याचे प्रमाण कमीच होते अशी सर्वसाधारण स्थिती होती. सोलापूरातील महिला कामगारांच्या वेतनाचा विचार करता मागे म्हटंल्याप्रमाणे मुंबई व अहमदाबाद शहरातील कामगारांपेक्षा त्यांचे वेतन कमी होते, दुसरे म्हणजे ज्या रिलींग आणि वायंडिंग विभागात महिला मोठया संख्येने काम करीत असत तेथील वेतन पुरुषांच्या मानाने खूपच कमी होते तसेच गिरणीतील

झाडुवाल्या, हेलकरी इ. अकुशल कामगारांच्या वेतनाचे प्रमाण खूपच कमी होते तरीही गरजेपोटी असंख्य महिला कामगार या तुटपुंज्या वेतनावर काम करीत असल्याची माहिती मिळते.[२१] १९४० सालापर्यंत तरी सोलापूरातील गिरण्यात काम करणाऱ्या महिलांपैकी काही थोडयाच महिला मुकादम किंवा जॉबर या पदावर काम करीत असत. या महिलांना महिन्याकाठी साधारणपणे १२ ते १५ किंवा २० रुपयांपर्यत पगार मिळत होता. मात्र इतर विभागात काम करणाऱ्या महिला कामगारांना साधारणपणे दरमहा ८ ते १४ रुपयांपर्यत वेतन मिळत असे. वेतनाशिवाय गिरण्यांकडून मिळणाऱ्या बोनसचा मात्र सोलापूरातील पुरुष कामगारांपेक्षा महिला कामगार अधिक लाभ घेताना दिसतात.[२२] कामगारांना हा बोनस मिळविण्यासाठी आठवडयातील किंवा महिन्यातील पूर्ण दिवस कामावर हजर असणे आवश्यक होते यावरुन सोलापूरातील महिला कामगारांमध्ये खाडे करण्याचे प्रमाण कमी असावे असे दिसते.

आर्थिक पारतंत्र्य :

आर्थिक पारतंत्र्य किंवा स्वत:च्या कष्टातून मिळविलेल्या पैशांवर हक्क नसणे हे सोलापूरातील महिला गिरणी कामगारांच्या आर्थिक जीवनाचे एक वैशिष्टय होते.येथील गिरणी कामगारांपैकी बहुतांशी महिला विवाहीत असल्यामुळे त्या आपले महिन्यांचे संपूर्ण वेतन कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्या पतीकडे सोपवित असत. एकत्रित कुटुंबात राहणाऱ्या विधवा महिला कामगार आपल्या घरातील इतर कर्त्या पुरुषांकडे आपली मासिक मिळकत सुपूर्द करीत असत. आपल्या मुलाबाळांसह एकटया राहणाऱ्या महिला मात्र स्वत:च्या हातातच पैसे ठेवीत असत. काही विधवा महिला कामगार आपल्या नातेवाईकांकडे पगार देत असल्याची माहिती मिळते. विवाहीत महिला कामगारांसाठी गिरण्यांतील पगार म्हणजे घर खर्चासाठीचा मोठा हातभार होत असे. मात्र, विधवा व एकटया राहणाऱ्या निराधार महिलांवर आपल्या कुटुंबाचा सर्व भार असल्यामुळे त्यांना मिळणारा पगार स्वत:सह घरातील एक–दोन मुलांच्या उदरनिर्वाहासाठी अपुरा पडत असे.[२३] याशिवाय सोलापूरातील पुरुष व महिला गिरणी कामगारांमध्ये कर्जबाजारीपणाचा दोष दिसून येतो. विशेषत: विधवा व निराधार महिलांच्या बाबतीत कर्जबाजारीपणा ही नित्याची बाब होती. घरातील विवाहाच्या प्रसंगी, धार्मिक समारंभाच्या प्रसंगी या महिला कामगारांना कर्ज काढावे लागे. बऱ्याचदा या महिला कामगार सणवार व किंवा विवाह इ. प्रसंगी शहरातील दुकानदारांकडून कापड वगैरे वस्तू हप्त्यावर खरेदी करीत असल्यामुळे त्यांच्यामागे नेहमीच दुकानदारांचा व सावकारांचाही तगादा असे.

गिरण्यांनी महिला कामगारांच्या कल्याणासाठी केलेले प्रयत्न:

मुंबई प्रांतातील इतर औद्योगिक केंद्रांच्या मानाने सोलापूरातील कापड गिरण्यांनी आपल्या कामगारांच्या कल्याणासाठी अनेक उल्लेखनीय योजना राबविल्याचे दिसून येते.[२४] सोलापूर स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग किंवा जुन्या गिरणीने कामगार कल्याणाच्या योजनांचा पाया घालत शहरातील इतर गिरण्यांपुढे आदर्श निर्माण केल्याने येथील इतर सर्वच गिरण्यांच्या व्यवस्थापनाने कामगार हिताकडे प्राधान्याने लक्ष दिल्याचे दिसून येते. याठिकाणी केवळ महिला कामगारांशी संबंधित आरोग्य व लहान मुलांसाठी केलेल्या सुविधांचा विचार करण्यात आला आहे.

महिला कामगारांच्या आरोग्यविषयक सुविधांच्या बाबतीत विचार करता शहरातील पाचही गिरण्यांनी आपल्या महिला कामगारांच्या आरोग्यासाठी वैद्यकीय सुविधा व खास वैद्यकीय अधिकाऱ्यांची तरतूद केलेली होती. मुंबई प्रांतातील महिला कामगारांसाठी मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट नावाच्या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी जुलै, १९२९ साली सुरु झाली असली तरी सोलापूरातील गिरण्यांनी मात्र आपल्या कामगारांसाठी एका दशकापूर्वीच या सुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. गरोदरपणाच्या काळात महिला कामगारांना वैद्यकीय सल्ला व सुविधा पुरविण्याची व्यवस्था जवळपास सर्वच गिरण्यांनी केल्याची माहिती मिळते. शहरातील लक्ष्मी गिरणीच्या व्यवस्थापनाने यासंदर्भात पुढाकार घेत ऑगस्ट १९१४ पासून महिला कामगारांसाठी 'मॅटर्निटी बेनिफिट स्किम' किंवा मातृत्व लाभ योजना सुरु केली. या गिरणीने शहरातील लेडी डफरिन हास्पिटलमध्ये महिलांवर मोफत उपचाराची सोय केली. कामगार चाळीतही खास महिला डॉक्टरची सोय करुन प्रसुतीगृह सुरु केले. पुण्याच्या सेवा सदन संस्थेच्या सोलापूर शाखेच्या वतीनेही महिला परिचारिका व सुईणी गिरणीच्या चाळीतील घरोघरी फिरुन वैद्यकीय सल्ला व सुविधा पुरविणाऱ्या

स्वतंत्र सुईणी व परिचारिकांची व्यवस्था केल्याची माहिती मिळते. याशिवाय गंभीर आजार किंवा प्रसुती काळातील गुंतागुंतीच्या प्रश्नी गिरणीच्या महिला आरोग्याधिकारी कामगारांच्या प्रत्यक्ष घरी जाऊन उपचार करीत असत. लक्ष्मी गिरणीच्या पाठोपाठ जुन्या गिरणीने जानेवारी १९१८ पासून स्वत:चे १० खाटांचे प्रसुतीगृह सुरु केले. मॅटर्निटी बेनिफिट योजनेतंर्गत या गिरणीतील महिला कामगारांना गरोदरपणाच्या शेवटच्या महिन्यात पूर्ण वेतनाच्या बदल्यात साधी किंवा कमी वजनाची व कमी त्रासाची कामे दिली जात. याशिवाय ज्या महिलांची गिरणीतील सलग दोन वर्षांची सेवा पूर्ण झाली आहे अशा महिलांना प्रसुतीनंतरच्या तीन आठवडयांचे वेतन दिले जाई.[२५] सोलापूरातील गिरण्यांनी महिला कामगारांच्या गरोदरपणाच्या काळात व प्रसुतीनंतरच्या काळात महिला कामगारांसाठी केलेल्या आरोग्यविषयक सुविधा निश्चितपणे कौतुकास्पद होत्या. मात्र, दुसऱ्या बाजूला या सुविधा प्राप्त करण्यासाठी मागील नऊ महिन्यांपासून विनाखंडित काम करणाऱ्या महिलांच केवळ पात्र ठरीत असत त्यामुळे विना परवानगी गैरहजर राहणाऱ्या कामगारांची सेवा खंडित करणाऱ्या सोलापूरातील गिरण्यांतील किती महिला कामगारांना या सुविधांचा लाभ मिळत होता याबाबत शंका उपस्थित होते.[२६]

यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आपल्या लहान मुलांची काळजी व पालनपोषण करणे ही महिला गिरणी कामगारांच्या दृष्टीने अवघड बाब होती. सोलापूरातील तीन गिरण्यांनी अशा लहान मुलांसाठी पाळणागृहांची व्यवस्था केली होती. या प्रत्येक पाळणागृहात मुलांची काळजी घेण्यासाठी एक परिचारिका व पाच इतर आयांची नियुक्ती केलेली असे. पाळणागृहात आलेल्या मुलांना दररोज सकाळी गरम पाण्याची आंघोळ घालणे, स्वच्छ कपडे घालणे, दूधभात खाऊ घालणे इ. सुविधा पुरविल्या जात. १९२८—२९ या वर्षात पाळणागृहात दररोज सरासरी १४९ मुलांची काळजी घेतली जात असून यावर वार्षिक ४६५१ रुपये खर्च झाल्याची माहिती मिळते.[२७] गिरण्यांच्या पाळणागृहात मुलांना अत्यंत स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणात सांभाळले जाई त्यामुळे कामगार महिला घरांतही आपल्या मुलांच्या स्वच्छता व आरोग्याच्या बाबतीत अधिक दक्षता घेऊ लागल्या अशी माहिती मिळते.[२८]

सोलापूरांतील गिरण्यांनी महिला कामगारांसाठी व लहान मुलांच्या शिक्षणाचीही सोय केली होती. दोन कापड गिरण्यांनी लहान मुलांसाठी शिशु वर्गांची सोय केली होती. तसेच महिला व मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीतही गिरण्यांनी खास शिक्षणाचे वर्ग सुरु केले होते. मात्र, दुर्दैवाने या वर्गातील महिलांची उपस्थिती अतिशय नगण्य व अनियमित असल्याची माहिती मिळते. एकूणच तत्कालीन सामाजिक प्रथा व समजुती, पुराणमतवादी सवयी आणि मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन यामुळे महिला कामागारांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून येते.[२९] आरोग्य, शिक्षण व लहान मुलांसाठी पाळणागृहांच्या सुविधांबरोबरच सोलापूरातील गिरण्यांनी सर्वच कामगारांसाठी उपहारगृह, वाचनालय, कामगार भांडार, भविष्यनिर्वाह निधी आणि ग्रॅच्युटी फंड, ठराविक व्याजदरावर कर्ज निधीची व्यवस्था आणि सर्वात महत्वाचे म्हणजे गिरण्यांनी उभारलेल्या चाळींमधून जवळपास १२ टक्के कामगारांच्या निवासाची सोय केली होती. विशेष म्हणजे सोलापूरातील गिरण्यांनी कामगारांच्या मुलांसाठी व व अर्धवेळ कामगारांसाठी राबविलेल्या शैक्षणिक उपक्रमामुळे मुंबई प्रांतातील इतर केंद्राच्या तुलनेत सोलापूरात गिरणी कामगारांच्या मुलांमधील साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याची माहिती मिळते.[३०]

उपलब्ध अहवालांच्या आधारे सोलापूरातील महिला गिरणी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा विचार करता समाजाच्या विविध जाती—जमातींतील महिला गिरण्यांमध्ये काम करीत असत. या महिला कामगारांमध्ये शिक्षणाचा अभाव, कुटुंब व गिरण्यांतील दुहेरी जबाबदारीमुळे स्वत:च्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष, पुरुषांच्या तुलनेत गिरण्यांमधील तुटपुंजे वेतन, स्वत:ची आर्थिक मिळकत असूनही आर्थिक पारतत्र्यांची स्थिती इ. वैशिष्टये सांगता येतील. गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या निराधार व एकटया कामगार महिलांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती कमालीची बिकट असलेली दिसून येते. महिला गिरणी कामगारांसाठी सोलापूरातील गिरण्यांनी व सेवासदन सारख्या स्वयंसेवी संस्थांनी आरोग्य विषयक व इतर सुविधा पुरविल्या असल्या तरी महिला कामगारांची संख्या व गिरण्यांचे जाचक नियम यांमुळे या सुविधांचा सर्वच महिलांना लाभ मिळत नसे. एकंदरित विचार करता ब्रिटीश कालीन फॅक्टरी ॲक्टच्या तरतुदी व कामगार कल्याणाची संकल्पना अस्तित्वात असूनही प्रत्यक्षात स्वातंत्र्यपूर्व

काळातील सोलापूरातील गिरणी कामगार महिलांची परिस्थिती सर्वदृष्टीने फारशी समाधानकारक होती असे म्हणता येत नाही.

संदर्भ व तळटीपा

१.चोक्सी आर.डी., **इकॉनॉमिक लाईफ इन दि बॉम्बे डेक्कन, (१८१८ ते १९३९)**,एशिया पब्लिशिंग हाऊस, बॉम्बे, १९५५,पृ. ४९

२.जक्कल वि.न.(संपा.), **सोलापूर समाचार गोल्डन ज्युबिली अंक**, सोलापूर समाचार स्टीम प्रेस, सोलापूर, १९३६, पृ. १३२–३३

३.दास रजनीकांता, **फॅक्टरी लेबर्स इन इंडिया**,वॉल्टर डे ग्रेटेर ॲन्ड कंपनी, बर्लीन, १९२३ , पृ. २३

४.सेजविक एल.जे, **सेनसेस रिपोर्ट ऑफ इंडिया–१९२१ व्हॉल्युम. ९**, सिटीज् ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, येरवडा प्रिझन प्रेस, १९२२, पृ. ७८

५.सोर्ले एच.टी, **सेनसेस रिपोर्ट ऑफ इंडिया–१९३१ व्हॉल्युम. ९**, सिटीज् ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, पार्ट २ स्टॅटिस्टीकल टेबल्स, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, बॉम्बे, १९३३, पु. २८५

६. **रिपोर्ट ऑन दि इन्क्वायरी इनटु वेजेस ॲन्ड हावर्स ऑफ लेबर इन दि कॉटन मिल इंडस्ट्री, १९२६,** लेबर ऑफिस गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, बॉम्बे, १९३०, पृ. ६०

७. जी.फिंडले सिरास, **रिपोर्ट ऑन दि इन्क्वायरी इनटु वेजेस ॲन्ड हावर्स ऑफ लेबर इन दि कॉटन मिल इंडस्ट्री, १९२३**, लेबर ऑफिस गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे,बॉम्बे,१९२३, पृ.६७

८. रिपोर्ट ऑन दि इन्क्वायरी इनटु वेजेस ॲन्ड हावर्स ऑफ लेबर इन दि कॉटन मिल इंडस्ट्री, १९२६, पूर्वोक्त, पृ. १५

९. कित्ता., पृ. ३२

१०.एम.सिसाईल मॅथ्सन, **इंडियन इंडस्ट्री एस्टरडे, टुडे ॲन्ड टुमॉरो, ॲपेडिक्स २ ''रिपोर्ट ऑन दि इकॉनॉमिक स्टेटस आफॅ वुमेन वर्किंग इन शोलापूर मिल्स''**,द्वारा आर्यरिश विंगेट, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, बॉम्बे, १९३०, पृ. १८७

११.जक्कल वि.न., पूर्वोक्त., पृ. १२१–१२२

१२..एम.सिसाईल मॅथ्सन, पूर्वोक्त., पृ. १८८

१३. **रॉयल कमिशन ऑन लेबर इन इंडिया, ओरल इव्हिडन्स, बॉम्बे प्रेसिडेन्सी, व्हॉल्युम १,पार्ट २,** गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, १९३० पृ. २९२

१४. **रॉयल कमिशन ऑन लेबर इन इंडिया, इव्हिडन्स, व्हॉल्युम १ पार्ट १ बॉम्बे प्रेसिडेन्सी इनक्ल्युडिंग सिंध रिटन इव्हिडन्स,** लंडन, १९३१, पृ. ११

१५. कित्ता.,पृ. १९६

१६. रिपोर्ट ऑन दि इन्क्वायरी इनटु वेजेस ॲन्ड हावर्स ऑफ लेबर इन दि कॉटन मिल इंडस्ट्री, १९२६, पूर्वोक्त., पृ. ३८

१७. १९२६ च्या अहवालानुसार सोलापूरातील महिला कामगारांचे मासिक सरासरी वेतन ११ रु.६ आणे, ७ पैसे होते. मुंबईत हेच वेतन २० रु. ४ आणे, ६ पैसे तर अहमदाबादमध्ये २१ रु. १ आणा, ६ पैसे इतके असल्याची माहिती मिळते.

१८.**रिपोर्ट ऑफ इनव्हेस्टिगेशन इनटू दि कंडिशन्स ऑफ इंडियन टेक्सटाईल वर्कर्स १९२७** ,प्रेझेंटेंड टू दि इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ टेक्सटाईल वर्कर्स, १९२७, पृ.५८

१९. **रिपोर्ट ऑन दि टेक्सटाईल लेबर इन्क्वायरी कमिटी १९३७–३८ व्हॉल्युम १, इंटिरिम रिपोर्ट,** गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस,बॉम्बे, १९३८, पृ. २८

२०..एम.सिसाईल मॅथ्सन, पूर्वोक्त.,पृ. १८९

२१. रिपोर्ट ऑन दि टेक्सटाईल लेबर इन्क्वायरी कमिटी १९३७–३८ व्हॉल्युम १, पूर्वोक्त.,पृ. ८९–९०

२२. रिपोर्ट ऑन दि इन्क्वायरी इनटु वेजेस ॲन्ड हावर्स ऑफ लेबर इन दि कॉटन मिल इंडस्ट्री, १९२६, पूर्वोक्त., पृ. ६५–६६

२३..एम.सिसाईल मॅथ्सन, पूर्वोक्त.,पृ. १९१

२४. रिपोर्ट ऑफ इनव्हेस्टिगेशन इनटू दि कंडिशन्स ऑफ इंडियन टेक्सटाईल वर्कर्स १९२७, पूर्वोक्त., पृ. २६—२८
२५. रॉयल कमिशन ऑन लेबर इन इंडिया, इव्हिडन्स, व्हॉल्युम १, पार्ट १, बॉम्बे प्रेसिडेन्सी इनक्ल्युडिंग सिंध रिटन इव्हिडन्स, पूर्वोक्त., पृ. ३६
२६. **रिपोर्ट ऑन दि टेक्सटाईल लेबर इन्क्वायरी कमिटी १९४० व्हॉल्युम २, फायनल रिपोर्ट,** गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस,बॉम्बे, १९४०, पृ. ३०७
२७. रॉयल कमिशन ऑन लेबर इन इंडिया, इव्हिडन्स, व्हॉल्युम १, पार्ट १, बॉम्बे प्रेसिडेन्सी इनक्ल्युडिंग सिंध रिटन इव्हिडन्स, पूर्वोक्त., पृ. ४०
२८. रिपोर्ट ऑफ इनव्हेस्टिगेशन इनटू दि कंडिशन्स ऑफ इंडियन टेक्सटाईल वर्कर्स १९२७ पूर्वोक्त., पृ. २७
२९. कित्ता., पृ. २६
३०. लोकनाथन पी.एस., **इंडस्ट्रियल वेलफेयर इन इंडिया,** दि युनिव्हर्सिटी ऑफ मद्रास, मद्रास, १९२९, पृ. १२८—१२९